| 20 | **Auto Loan: UCR000404846970**<br>**Borrower: MUDALIAR NILESH DAMODARAN** 305 Drona Bldg Vishal Nagar Mith Chowki Marve Rd Old Uncles Kitchen Malad W Mumbai Maharashtra 400064 India **Ph:**9833109971<br>**Work Address: NEW AGE HOSPITALITY SERVICES** Shop No 1 2 3 Ganga Niwas Link Road Maladw Opp Toyota Show Room Mumbai Maharashtra 400064 India **Ph:** 9930060317<br>**Co-Borrower: NEW AGE HOSPITALITY SERVICES** New Age Hospitality Services Shop N, O 1 2 3 Ganga Niwas Link Road Malad, W Opp Toyota Showroom, W Opp Toyota Showroom, Mumbai, Maharashtra, 400064, India, **Ph:**9833109971 | **Date of NPA:** 11-04-2021<br>**Date of Demand:** 05-01-2024<br>**Outstanding Amount:** Rs.1119198/- | **Vehicle :** BENZ - MERCEDES CAT D - MERCEDES BENZ<br>**Registration :** MH14DT0654<br>**Engine Number :** 65191120655227<br>**Chassis Number:** WDD204036L050147 |
| 21 | **Auto Loan: AUR032702083560**<br>**Borrower: GULAMANAVI MUSIR KHAN** H No 3679/1 Ummat Nagar Gayatri Nagar Bhiwandi Correct City Mumbai Thane Maharashtra 421302 India **Ph:**9775355688<br>**Permanent Address:** Sayora Comound Nagar Road Gayathri Nagar Pincode 421302 Mumbai Maharashtra 400001 India<br>**Work Address: KGN TOURS AND TRAVELS** H No 3679/1ummat Nagar Gayatri Nagar Bhiwandi Correct City Mumbai Mob No Not Lr Thane Maharashtra 421302 India **Ph:** 9175355688<br>**Co-Borrower: GULSHAN GULAMANAVI KHAN** H No 3679/1 Ummat Nagar, Gayatri Nagar Bhiwandi, Thane, Maharashtra, 421302, India, **Ph:**9175355688 | **Date of NPA:** 17-05-2018<br>**Date of Demand:** 05-01-2024<br>**Outstanding Amount:** Rs.1124166/- | **Vehicle :** HYUNDAI - HYUNDAI CAT C - XCENT<br>**Registration :** MH04HN1988<br>**Engine Number :** D3FAGM139723<br>**Chassis Number:** MALA841DLGM201259 |
| 22 | **Auto Loan: AUR064702013043**<br>**Borrower: FIDAHUSSAIN IQBALHUSSAIN SHAIKH** Rm No 389 Chawl No 49 D G Nagar M H B Colony Gate No 08 Near Bus Depot Malwani Malad West Mumbai Maharashtra 400095 India Ph:7666224636<br>**Work Address: H D TOURS & TRAVELS** R M No 49 Chawlm Hb Colony Gate No 08 Near Busdepot Malwani Malad West Mumbai Maharashtra 400095 India **Ph:** 7666224636<br>**Co-Borrower: NOORULHUDA FIDAHUSSAIN SHAIKH** 49 389 A M Hb Colony Gate No 08, Near Bus Depot Malwani, Malad West, Malad West, Mumbai, Maharashtra, 400095, India, **Ph:**7666224636 | **Date of NPA:** 14-11-2018<br>**Date of Demand:** 05-01-2024<br>**Outstanding Amount:** Rs.1135362/- | **Vehicle :** HONDA - HONDA CAT C - MOBILIO<br>**Registration :** MH47N2275<br>**Engine Number :** N15A11322052<br>**Chassis Number:** MAKDD575CFN008390 |
| 23 | **Auto Loan: AUR032703074513**<br>**Borrower: FULCHAND SUDAM PATIL** Sai Amrut Apartment 101 Diva Shil Road Behind Kalpataru Jewellers Div Navi Mumbai Maharashtra 400612 India **Ph:**9222999060<br>**Work Address: EK VEERA AAI ENTERPRISE** Sai Amrutapt R No 01 A Wing Sabegaon Divanavi Mumbai Maharashtra 400612 | **Date of NPA:** 01-07-2020<br>**Date of Demand:** 15-11-2023<br>**Outstanding Amount:** Rs.1136417/- | **Vehicle :** MAHINDRA CAT C MAHINDRA & MAHINDRA - - MAHINDRA & MAHINDRA<br>**Registration :** MH04JM2657<br>**Engine Number :** JJJ4A79850<br>**Chassis Number:** MA1YA2JJKJ2A17664 |
| 24 | **Auto Loan: UCR032702960305**<br>**Borrower: ANIL SHESHNARAYAN MALI** Room No 6 Krushna Smruti Building Ground Floor Neera Nagar Road Near Ravnanda Deep Building Cholegaon Thane Maharashtra 421201 India **Ph:**9172220621<br>**Work Address:** Home State Agency Room No 6 Krushna Smruti Buildingground Floor Neeranagar Road Chole Gaon Thane Maharashtra 421201 INDIA **Ph:** 9172220621 | **Date of NPA:** 11-04-2021<br>**Date of Demand:** **05-01-2024**<br>**Outstanding Amount:** Rs.1139411/- | **Vehicle :** TOYOTA - TOYOTA CAT C - INNOVA<br>**Registration :** MH43AT7422<br>**Engine Number :** 2KD0814985<br>**Chassis Number:** MBJ11JV4007563058 |

**Date : 29.05.2024**
**Place : Mumbai**

**Sd/-**
**Authorised Officer,Axis Bank Ltd**

## सवलतीच्या दरात रशियन तेल खरेदी

# रिलायन्स इंडस्ट्रीजचा 'रोझनेफ्ट'शी करार

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**



**मुकेश अंबानी** यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने रशियाच्या 'रोझनेफ्ट'शी महिन्याला किमान ३० लाख पिंप खनिज तेल खरेदीचा एक वर्षाच्या करारावर स्वाक्षरी केली आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी अमेरिका आणि युरोपीय देशांनी लादलेल्या निर्बंधांना न जुमानता, रशियन चलन रूबलमधून होणाऱ्या या व्यापार-कराराकडे पाश्चात्त्य आर्थिक व्यवस्थेला पर्याय म्हणून बघितले जात आहे.

'ओपेक प्लस' देशांची खनिज तेल उत्पादन कपातीबाबत येत्या २ जूनला बैठक पार पडणार आहे. त्यातून खनिज तेल उत्पादनात कपातीचा निर्णय झाल्यास त्याची परिणती म्हणून तेलाच्या किमती भडकण्याची शक्यता आहे. मात्र रोझनेफ्टशी या करारामुळे रिलायन्सला सवलतीच्या दरात खनिज तेल उपलब्ध होणार आहे. सध्या प्रचलित आंतरराष्ट्रीय किमतीच्या तुलनेत प्रति पिंप ३ डॉलर सवलतीने हे तेल उपलब्ध होणार आहे.

रिलायन्सकडून होणारी तब्बल ३० लाख पिंप तेल खरेदी पाहता, हा करार कंपनीसाठी आर्थिकदृष्ट्या खूपच लाभकारक ठरणे अपेक्षित आहे.

# मार्च तिमाहीत 'जीडीपी'वाढ खुंटणार!

**एक्स्प्रेस वृत्त, नवी दिल्ली**



| जीडीपी अंदाज (%) | चौथी तिमाही | वार्षिक (२०२३-२४) |
|---|---|---|
| इंडिया रेटिंग्ज | ६.२ | ७.७ |
| एचडीएफसी ट्रेझरी रिसर्च | ६.५ | ७.८ |
| इक्रा | ६.७ | ७.८ |
| एम्के ग्लोबल | ६.९-७ | ७.८-८ |
| डीएसपी ग्रुप रिसर्च | ७ | ८ |
| आयडीएफसी फर्स्ट बँक | ७.१ | ७.९ |
| डॉइशे बँक | ७.३ | ८ |
| कोटक महिंद्र बँक | ६.१-६.७ | ७.६-७.८ |

**आर्थिक वर्ष** २०२३-२४ मध्ये देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनातील (जीडीपी) पहिल्या तीन तिमाहींतील ८ टक्के वाढीच्या तुलनेत विकासवेग चौथ्या तिमाहीत खुंटण्याची शक्यता असून, जानेवारी-मार्च २०२४ तिमाहीत जीडीपीवाढीचा दर ६.२ ते ७.३ टक्के राहण्याची शक्यता बहुतांश अर्थविश्लेषकांनी व्यक्त केली आहे. उत्पादन आणि सेवा क्षेत्रात झालेल्या घसरणीमुळे तिमाहीतील वाढ नरमणार असून, संपूर्ण आर्थिक वर्षासाठी विकासदर ७.८ टक्के राहण्याचे अंदाजण्यात येत आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय सरलेल्या चौथ्या तिमाहीतील जीडीपीची आकडेवारी येत्या ३१ मे रोजी जाहीर करणार आहे. २९ फेब्रुवारी रोजी जीडीपीचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता, तो दर ७.६ टक्के राहील असे नमूद करण्यात आले होते. तर सरलेल्या आर्थिक वर्षातील ऑक्टोबर-डिसेंबरमध्ये तो ८.४ टक्के, जुलै-सप्टेंबरमध्ये ८.१ टक्के आणि एप्रिल-जूनमध्ये ८.२ टक्के राहिला होता.

'इक्रा'ने विकासदर तिसऱ्या तिमाहीतील ८.४ टक्के दरावरून तो चौथ्या तिमाहीत ६.७ टक्क्यांपर्यंत घटण्याची शक्यता व्यक्त केली आहे. औद्योगिक क्षेत्रांच्या नफ्यामध्ये घट होण्याची शक्यता आहे, असे 'इक्रा'च्या मुख्य अर्थतज्ज्ञ आदिती नायर म्हणाल्या. तर एचडीएफसी ट्रेझरी रिसर्चने जीडीपी ६.५ टक्के राहण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. पूर्ण वर्षासाठी तो ७.६ टक्क्यांच्या तुलनेत ७.८ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये उत्पादन क्षेत्र हेच प्रमुख वाढीचे चालक असेल अशी अपेक्षा आहे. मात्र कृषी क्षेत्रात किरकोळ आकुंचन दाखविण्याची अपेक्षा आहे.

लोकसभा निवडणुकीचाही विकासदरावर परिणाम झालेला दिसतो. 'डीबीएस ग्रुप रिसर्च'च्या मते, निवडणुकीनंतर महागाई वाढण्याची शक्यता आहे. मात्र डीबीएस इतरांच्या तुलनेत अधिक आशादायी असून चौथ्या तिमाहीत वास्तव जीडीपीवाढ ७ टक्क्यांची, तर संपूर्ण आर्थिक वर्षासाठी तो ८ टक्क्यांच्या जवळ असेल, असा सकारात्मक अंदाज तिने वर्तवला आहे.

## पॅन-आधार जोडणी ३१ मेपर्यंत अनिवार्य

**पीटीआय, नवी दिल्ली**

प्राप्तिकर विभागाने ज्या करदात्यांनी पॅन-आधारची जोडणी अद्याप केलेली नाही त्यांना ती येत्या ३१ मेपर्यंत पूर्ण करण्यास सुचविले आहे. जर प्राप्तिकर कायम खाते क्रमांक अर्थात 'पॅन' बायोमेट्रिक पद्धतीने आधारशी जोडलेला नसेल, प्राप्तिकराच्या नियमांनुसार तर अशा करदात्याचा उद्गम कर (टीडीएस) लागू दरापेक्षा दुप्पट दराने कापला जाणार आहे.

करदात्यांना टीडीएस/ टीसीएसच्या 'शॉर्ट-डिडक्शन/कलेक्शन'मध्ये कसूर झाल्याचे सूचित करणाऱ्या नोटिसा प्राप्त झाल्याच्या तक्रारी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाला (सीबीडीटी) प्राप्त झाल्या होत्या. त्यावर, ३१ मार्च २०२४ पर्यंत झालेल्या व्यवहारांसाठी आणि ३१ मे २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी पॅन- आधार जोडणी झाल्यास करदात्यांवर उच्च दराने कोणत्याही कराचा भार येणार नाही. परंतु शथिलतेची ही मुदत ३१ मे नंतर संपुष्टात येत आहे.

## 'एलआयसी' आरोग्य विम्यात विस्ताराच्या तयारीत

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** देशातील सर्वात मोठी आयुर्विमा कंपनी असलेली भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसी आता आरोग्य विमा व्यवसायात विस्ताराची शक्यता अजमावत आहे. आरोग्य विम्या पाऊल ठेवण्यासाठी विविध पर्यायांचा शोध घेतला जात आहे, अशी माहिती एलआयसीचे अध्यक्ष सिद्धार्थ मोहंती यांनी सोमवारी दिली.

विद्यमान विमा कायद्यात सुधारणा करून संमिश्र परवान्याला मुभा दिली जाईल अशी अपेक्षा आहे. विमा कायदा, १९३८ आणि भारतीय विमा नियामक विकास प्राधिकरणाच्या नियमांनुसार, विमा कंपनीला एका संस्थेच्या छत्राखाली आयुर्विमा, सामान्य किंवा आरोग्य विमा योजना देण्याची परवानगी नाही.

एलआयसी जरी सर्वसाधारण विमा क्षेत्रातील तज्ज्ञ नाही. मात्र आरोग्य विमा क्षेत्रात चांगले कार्य करू शकते, असे मोहंती म्हणाले. फेब्रुवारीमध्ये, माजी अर्थ राज्यमंत्री जयंत सिन्हा यांच्या नेतृत्वाखालील संसदीय समितीने देशात विम्याची व्याप्ती वाढवण्यासाठी एका संस्थेच्या छत्राखाली आयुर्विमा, सामान्य किंवा आरोग्य विमा योजना सुरू करण्यासाठी संमिश्र परवाना देण्याची शिफारस केली आहे.

संमिश्र परवाने खुले झाल्यास विमा क्षेत्राला ते चालना देणारे ठरेल. ग्राहकांना कमीत कमी खर्चामध्ये अधिक पर्याय उपलब्ध होऊ शकतात, असे अहवालात समितीने म्हटले आहे. विमा नियामकदेखील विद्यमान विमा कायद्यात सुधारणा करण्याचा विचार करत आहे.

**तिमाही नफा १३,७६३ कोटींवर**

एलआयसीने मार्च २०२४ अखेर तिमाहीत २ टक्के वाढ नोंदवत १३,७६३ कोटी रुपयांचा नफा कमावला. गेल्या वर्षी याच तिमाहीत तिला १३,४२८ कोटींचा नफा झाला होता. कंपनीचे एकूण उत्पन्न मागील आर्थिक वर्षाच्या याच कालावधीतील २,००,१८५ कोटी रुपयांवरून २,५०,९२३ कोटी रुपयांवर पोहोचले आहे.

## 'कॉसमॉस बँके'चे व्यावसायिक कर्ज वितरण २,००० कोटींवर नेण्याचे लक्ष्य

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** देशातील दुसऱ्या क्रमांकाची सहकारी बँक असलेल्या कॉसमॉस बँकेने मार्च २०२५ पर्यंत, छोट्या व्यावसायिक कर्जावर भर देण्याचे आणि या क्षेत्रात २,००० कोटी रुपयांच्या कर्ज वितरणाचे लक्ष्य ठेवले आहे. मुंबईतील शाखांमधून यापैकी २५ टक्क्यांहून अधिक म्हणजे जवळपास ५५० कोटी रुपयांचे योगदान येईल, असे प्रतिपादन बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे यांनी मंगळवारी केले.

कॉसमॉस बँकेने सरलेल्या आर्थिक वर्षात ३८४ कोटी रुपयांचा विक्रमी निव्वळ नफा कमावला. बँकेच्या ठेवी मार्च २०२४ अखेर २०,२१६ कोटींवर पोहोचल्या असून, कर्ज वितरण १५,१९२ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. रिझर्व्ह बँकेच्या दंडकांप्रमाणे नागरी सहकारी बँकांच्या एकूण कर्ज वितरणांत, १ कोटी रुपयांपेक्षा कमी रकमेच्या रिटेल कर्जाचे प्रमाण ५० टक्के असायला हवे. कॉसमॉस बँकेबाबत हे प्रमाण सध्या ४३ टक्के असून, ते मार्च २०२५ पर्यंत ५० टक्क्यांवर नेले जाईल. त्यासाठी लघुउद्योग, व्यावसायिक आणि छोट्या व्यापाऱ्यांच्या कर्ज प्रस्तावांना प्राधान्य दिले जाईल, असे काळे यांनी स्पष्ट केले. २०२३-२४ मध्ये बँकेने एकूण व्यवसायात १५.१६ टक्क्यांची वाढ केली, चालू वर्षातही व्यवसाय वाढीचा हा दर साध्य केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**नवीन बँका संपादण्याचा प्रस्ताव नाही!**

सहकारी बँकिंग क्षेत्रात १९९९ पासून, तब्बल १८ आजारी सहकारी बँकांना कॉसमॉस बँकेने ताब्यात घेतले असून, सध्याच्या १७० शाखांच्या जाळ्यात ९० शाखांची भर या संपादित बँकांमुळे होऊ शकली आहे. मागील आर्थिक वर्षात ताब्यात घेतलेल्या मुंबईतील दोन बँकेमुळे ती महानगरातील सर्वाधिक ५० शाखा असणारी सहकारी बँक बनली. पण तूर्त कोणत्याही आजारी बँकेच्या संपादनावर सक्रियपणे विचार सुरू नसल्याचे बँकेने स्पष्ट केले.

## 'सेन्सेक्स'ची २२० अंशांनी पीछेहाट

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** लोकसभा निवडणूक निकाल जाहीर होण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिले असताना, भांडवली बाजारात निकालासंबंधाने तेजीवाल्या आणि मंदीवाल्यांमध्ये चांगली जुंपली असून, त्या परिणामी दिवसाच्या व्यवहार सत्रात सुरू असलेल्या चढ-उतारांचा अनुभव मंगळवारच्या सत्रानेही दिला. वरच्या स्तरावर म्हणूनच गुंतवणूकदार नफावसुलीला प्राधान्य देत असल्याचे दिसून आले.

मंगळवारच्या सत्रात गुंतवणूकदारांनी ऊर्जा, इंधन आणि भांडवली वस्तूंशी संबंधित कंपन्यांच्या समभागांमध्ये विक्रीचा मारा केला. परिणामी प्रमुख निर्देशांकांमध्ये सलग तिसऱ्या सत्रात घसरण झाली. विश्लेषकांच्या मते, सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालांपूर्वी अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर शेअर बाजारात 'बाइंग ऑन डीप आणि सेल ऑन रॅली' या सूत्राचे गुंतवणूकदारांकडून अनुसरण होत असल्याचे दिसत आहे. परिणामी दिवसअखेर सेन्सेक्स २२०.०५ अंशांनी घसरून ७५,१७०.४५ पातळीवर बंद झाला. दिवसाची सुरुवात सकारात्मक होऊनही, निफ्टीमध्ये ४४.३० अंशांची घसरणीने तो २२,८८८.१५ पातळीवर स्थिरावला.

निकालाबाबत अनिश्चिततेमुळे नजीकच्या काळात बाजारात अस्थिरता कायम राहण्याची शक्यता आहे. मिड व स्मॉल कॅप समभागांची कामगिरी निराशाजनक राहिली. तर औषधनिर्माण आणि ग्राहकोपयोगी उत्पादन ही क्षेत्रे लाभदायी राहतील, असे मत जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी व्यक्त केले.

# दिवाळखोर रेडियस इस्टेट अवघ्या ७६ कोटींत 'अदानी'कडे

*(पान १ वरून)* दिली. या योजनेच्या बाजूने दोनतृतीयांशपेक्षा जास्त कर्जदात्या संस्थांनी कौल दिला होता. पण कर्जदात्या गटातील आयसीआयसीआय प्रुडेन्शियल व्हेंचर कॅपिटल फंड आणि बीकन ट्रस्टीशिप यांनी त्या योजनेला विरोध केला.

निराकरण व्यावसायिक (आरपी) जयेश संघराजका यांनी एचडीएफसी बँकेशी संगनमत करून केवळ अदानींची एकमेव बोली राहील, असा प्रयत्न केल्याचा त्यांचा आरोप होता. त्यांनी त्या विरोधात अपिलीय न्यायाधिकरण अर्थात 'एनसीएएलटी'कडे दाखल अपिलातही, एनसीएलटीच्या मुंबई खंडपीठाने दिलेल्या पूर्वीच्या आदेशाला कायम राखणारा निवाडा आला.

### प्रकरण काय?

- ■ रेडियस इस्टेट्स अँड डेव्हलपर्सने मुंबईत वांद्रे (पूर्व) येथील एमआयजी (वांद्रे) रिॲल्टर्स आणि बिल्डर्ससह जमिनीचा पुनर्विकास करण्यासाठी हातमिळवणी केली होती. प्रकल्पामध्ये मध्यम-उत्पन्न गट सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांच्या पुनर्वसनासाठी निवासी सदनिका बांधण्यात येणार होत्या.
- ■ जानेवारी २०२०मध्ये बांधकाम थांबले, रेडियस इस्टेटच्या विरोधात दिवाळखोरी प्रक्रिया सुरू झाली.
- ■ रेडियस इस्टेट्सने तोपर्यंत २२४ सदनिका विकल्या होत्या आणि त्या मोबदल्यात ८०० कोटी रुपये मिळविले. १४६ सदनिका शिल्लक होत्या.
- ■ प्रस्तावित १५ इमारतींपैकी केवळ नऊ इमारतींचे अर्धवट बांधकाम झाले होते आणि उर्वरित सहा इमारतींचे कामही सुरू झाले नव्हते.
- ■ दिवाळीखोरी प्रक्रियेअंतर्गत अखेर अदानी गुडहोम्सच्या या योजनेला कर्जदात्यांच्या समितीने मतदानात ८३.९३ टक्के कौल देत मंजुरी दिली.
- ■ त्याविरोधात दाखल अपिलात आता 'एनसीएएलटी'ने

**घर खरेदीदारांना दिलासा**

रेडियस इस्टेटच्या सुमारे ७०० घरमालकांनी, एकत्रितपणे ८०० कोटी रुपये कंपनीला दिले आहेत. घरमालकांना आर्थिक कर्जदारांसारखे समान अधिकार असले तरी, त्यांची गणना कर्जदारांचा एक वेगळा वर्ग म्हणून केली जाते. नव्याने ताबा मिळविलेल्या अदानी गुडहोम्सने प्रकल्पाचे रखडलेले बांधकाम पूर्ण करण्याचे आणि घरखरेदीदारांना कोणतीही अतिरिक्त रक्कम न घेता घरे देण्यास मान्यता दिली आहे.

**BARC HOSPITAL**
**Anushaktinagar, Mumbai**

**Walk-in-interview** will be conducted at BARC Hospital on, **30.05.2024** at detailed below:-

- ➢ Post Graduate Resident Medical Officer in various Disciplines.
- ➢ Resident Medical Officer (ICCU)

Reporting time :- **08.30hrs. to 09.30hrs**

**For details please visit BARC Website at www.barc.gov.in**

**PUBLIC NOTICE**
HINDALCO INDUSTRIES LIMITED
Registered Office: 21st Floor, One Unity Centre, Senapati Bapat Marg, Prabhadevi Mumbai-400013
TO WHOMSOEVER IT MAY CONCERN
NOTICE is hereby given that the certificate[s] for the under mentioned securities of the Company has/have been lost/misplaced and the holder[s] of the said securities / applicant [s] has/have applied to the Company to issue duplicate certificates].
Name of the holder: Sunita Tayal, Folio No: HEA37782 Face Value Re.1/-, Certificate Number: 11047005, Distinctive Number [s]: 120850261-120851260, No of Shares: 1000.
The Public are hereby cautioned against purchasing or dealing in any way with the above referred share certificate[s].
Any person who has any claim in respect of the said share certificate[s] should lodge such claim with the Company or its Registrar and Transfer Agents Link Intime India Private Limited 247 Park, C-101, 1st Floor, L. B. S. Marg, Vikhroli (W) Mumbai-400083. TEL: 8108116767 within 15 days of publication of this notice after which no claim will be entertained and the Company shall proceed to issue with the Duplicate Share Certificate.
Name[s] of the holder: Sunita Tayal.
Place: Mumbai Date:29.05.2024

JUNIPER HOTELS

**ज्युनिपर हॉटेल्स लिमिटेड**
**(ज्युनिपर हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून पूर्वज्ञात)**
CIN :U55101MH1985PLC152863
**नोंदणी. कार्यालय :** ऑफ वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, सांताक्रुझ पूर्व, मुंबई - ४०० ०५५.
**ई-मेल :** complianceofficer@juniperhotels.com;
**संकेतस्थळ :** www.juniperhotels.com

**३१ मार्च, २०२४ रोजी समाप्त तिमाहीकरिता लेखापरीक्षीत स्वतंत्र आणि एकत्रित वित्तिय निष्कर्षांचे सारांश**

(नमूद केलेले नसल्यास, रु.लाखात)

| तपशिल | स्वतंत्र | | | | | एकत्रीकृत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तिमाहि अखेर | | | वर्ष अखेर | | तिमाहि अखेर | | | वर्ष अखेर | |
| | ३१ मार्च, २०२४ (लेखापरीक्षीत) | ३१ डिसेंबर, २०२३ (अलेखापरीक्षीत) | ३१ मार्च, २०२३ (अलेखापरीक्षीत) | ३१ मार्च, २०२४ (लेखापरीक्षीत) | ३१ मार्च, २०२३ (लेखापरीक्षीत) | ३१ मार्च, २०२४ (लेखापरीक्षीत) | ३१ डिसेंबर, २०२३ (अलेखापरीक्षीत) | ३१ मार्च, २०२३ (अलेखापरीक्षीत) | ३१ मार्च, २०२४ (लेखापरीक्षीत) | ३१ मार्च, २०२३ (लेखापरीक्षीत) |
| एकूण उत्पन्न | २१,६८६.५० | २०,६१८.४४ | १९,८८७.२७ | ७६,०५०.७२ | ७१,७३३.८५ | २४,८१७.६४ | २४,०६९.९४ | १९,८८६.०२ | ८२,६३०.६२ | ७१,७२८.८२ |
| करपूर्व नफा / (तोटा) | ५१४.८० | २४.८४ | १,०३३.३९ | (४,१११.५०) | (२,५४६.०४) | ६८७.०२ | २९२.०८ | १,०३१.५४ | (३,६७४.८३) | (२,५५१.९२) |
| कालावधीसाठी नफा / (तोटा) | ३,५४३.९१ | २१.१८ | १,४७७.४० | ९०८.३४ | (१५९.२५) | ४,६७५.५२ | ३५४.४८ | १,४७९.३९ | २,३७९.७९ | (१४९.७६) |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न /(तोटा), कराच्या निव्वळ | ३,४९८.१८ | ११.२२ | १,४३८.४४ | ८७५.६३ | (१९५.५३) | ४,६३३.८६ | ३४५.५० | १,४४०.४३ | २,३५२.१३ | (१८६.०४) |
| पूर्ण भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनि मूल्य रु.१०/- प्रती शेअर) | २२,२५०.२४ | १७,२५०.२४ | १४,३७०.०० | २२,२५०.२४ | १४,३७०.०० | २२,२५०.२४ | १७,२५०.२४ | १४,३७०.०० | २२,२५०.२४ | १४,३७०.०० |
| अन्य इक्वीटी | | | | २,३९,५८२.६१ | १८,८६३.२१ | | | | २,४३,२७६.३८ | २१,०८०.७० |
| पालकाच्या समभागधारकाला फलस्वरूपयोग्य प्रत्येकी रु. १०/- च्या प्रती समभागावर उत्पन्न / (तोटा) मुलभूत आणि सौम्यीकृत (रु.) | १.८६* | ०.०१* | १.०३* | ०.५६ | (०.११) | २.४६* | ०.२१* | १.०३* | १.४६ | (०.१०) |

* वार्षिकीकृत नाही

**लेखापरीक्षीत वित्तिय निष्कर्षांची टीप :**

१. सुधारित अनुसार सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्यूलेशन्स, २०१५ (''**लिस्टींग रेग्यूलेशन्स**'') च्या रेग्यूलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल लेखापरीक्षित निष्कर्षांच्या तपशीलाचा उपरोक्त हा सारांश आहे. लेखापरीक्षीत वार्षिक निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सजेंजेसच्या संकेतस्थळ www.nseindia.com आणि www.bseindia.com नॅशनल आणि कंपनीच्या संकेतस्थळ www.juniperhotels.com वर उपलब्ध आहे.

**ज्युनिपर हॉटेल्स लिमिटेडच्या सेचालक मंडळा करिता आणि वतीने**
**हस्ता/-**
**अरूण कुमार सराफ**
**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन - ००३३९७७२**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : २७ मे, २०२४**

Adfactors 107

TATA

**टाटा मोटर्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय :** बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई-४००००१.
**दूर.:** +९१ २२ ६६६५ ८२८२ **ई-मेल :** inv_tatamotors.com
**संकेतस्थळ :** www.tatamotors.com **सीआयएन :** एल२८९२०एमएच१९४५पीएलसी००४५२०

**७९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **टाटा मोटर्स लिमिटेड ('दि कंपनी') ची ७९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') व्हिडीओ कॉन्फरन्स ('व्हीसी')/ अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स ('ओएव्हीएम')द्वारे सोमवार, जून २४, २०२४ रोजी दु. २.३० वा. (भाप्रवे),** एजीएम बोलविणाऱ्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या व्यवसायांवर विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे, याची सूचना सभासदांना पाठविण्यात येणार आहे.

कंपनी व्यवहार मंत्रालय ('एमसीए') साधारण परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांकित एप्रिल ८, २०२०, १७/२०२० दिनांकित एप्रिल १३, २०२०, २०/२०२० दिनांकित मे ५, २०२०, १०/२०२२ दिनांकित डिसेंबर २८, २०२२ आणि त्यानंतर यासंदर्भात नंतर जारी करण्यात आलेल्या संबंधित परीपत्रकांसह त्यामधील सर्वात अखेरचे असलेले ०९/२०२३ दिनांकित सप्टेंबर २५, २०२३ ('एमसीए परिपत्रक' असा संदर्भ असलेले)सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा २०१३ च्या लागू असलेल्या तरतुदी आणि त्या अंतर्गत करण्यात आलेल्या नियमावलीच्या अनुपालनार्थ आहे.

उपरोक्त नमूद एमसीए परिपत्रके आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाद्वारे जारी करण्यात आलेले परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९, दिनांकित मे १२, २०२०, सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दिनांकित जानेवारी १५, २०२१, सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/ पी/२०२२/६२ दिनांकित मे १३, २०२२, सेबी/एचओ/सीएफडी/पीओडी-२/पी/ सीआयआर/२०२३/४ दिनांकित जानेवारी ५, २०२३ आणि सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/ सीआयआर/पी/२०२१/१६७ दिनांकित ऑक्टोबर ७, २०२३ (संयुक्तपणे सेबी परिपत्रके असा संदर्भ असलेले) च्या अनुपालनार्थ एजीएमची सूचना असलेला आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी एकात्मिकृत वार्षिक अहवाल ('एकात्मिकृत वार्षिक अहवाल') अशा सभासदांना ज्यांच्या ई-मेल आयडीची नोंद कंपनी/नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) आणि सेन्ट्रल डिपॉझिटरीज सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) (संयुक्तपणे डिपॉझिटरीज/ डीपीज असा संदर्भ असलेले) रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट ('रजिस्ट्रार'/'आरटीए')/ यांच्याकडे करण्यात आली आहे, त्यांना पाठविण्यात येईल. कंपनी एकात्मिक वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत अशा सभासदांना पाठविण्यात येईल, ज्यांनी त्यासाठी inv_rel@tatamotors.com वर त्यांचा फोलियो क्र./ डीपी आयडी आणि क्लायंट आयडी नमूद करून पाठवले आहे त्यांना पाठविण्यात येईल.

एकात्मिकृत वार्षिक अहवाल, आर्थिक निवेदने आणि अन्य संवैधानिक अहवालांसह सूचनेची ई-कॉपी कंपनीचे संकेतस्थळ https://www.tatamotors.com/annual-reports/ वर आणि एनएसडीएलचे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com वरदेखील उपलब्ध असेल. त्याशिवाय, एजीएमची सूचना आणि एकात्मिक वार्षिक अहवाल स्टॉक एक्स्चेंजच्या संकेतस्थळावर म्हणजेच जेथे कंपनीचे रोखे सूचीबद्ध आहेत, त्यावर म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com वरदेखील उपलब्ध असेल.

सभासद केवळ व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये हजर राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात आणि त्यांची उपस्थिती कायद्याच्या कलम १०३ च्या अंतर्गत गणपूर्तीच्या कारणासाठी मोजणी करण्यात येईल. एजीएमला हजर राहण्याच्या सूचना एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आले आहे.

कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम २० सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १०८ मधील तरतुदी, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाद्वारे जारी करण्यात आलेल्या सर्वसाधारण बैठकांवरील सेक्रेटरियल स्टँडर्ड्स, वेळोवेळी फेरफार करण्यात आलेल्या सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) २०१५ च्या नियमावली ४४ आणि एमसीए परिपत्रकांच्या अनुषंगाने एजीएममध्ये विचार करण्यात येणाऱ्या व्यवसायाच्या संदर्भात त्यांच्या सभासदांना रिमोट ई-व्होटिंगची सुविधा कंपनी उपलब्ध करून देणार आहे. या कारणासाठी कंपनीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे मतदान करण्यासाठी एनएसडीएलची नियुक्ती केली आहे. त्यानुसार, एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंग सिस्टीम तसेच एजीएमदरम्यान रिमोट ई-व्होटिंगचा वापर करून सभासदांद्वारे मतदान करण्यासाठी सुविधांची तरतूद एनएसडीएलद्वारे करण्यात येईल. रिमोट ई-व्होटिंगसाठी तपशीलवार प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आली आहे. रिमोट ई-व्होटिंगची सुविधा खालील कालावधीमध्ये उपलब्ध असेल. रिमोट ई-व्होटिंग सुविधा खालील कालावधीदरम्यान उपलब्ध असेल.

| | |
|---|---|
| **ई-व्होटिंगची सुरुवात** | **गुरुवार जून २०, २०२४ रोजी स. ९.०० वा. (भाप्रवे) पासून** |
| **ई-व्होटिंगची समाप्ती** | **रविवार, जून २३, २०२४ रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) पर्यंत** |

सभासद ज्यांनी प्रत्यक्ष स्वरूपात भागधारणा केली आहे आणि ज्यांनी त्यांचे ई-मेल आयडी कंपनीकडे अपडेट केलेले नाहीत, त्यांना csg-unit@tcplindia.co.in वर लिहून ते अपडेट करण्याची विनंती केली जाते. अप्रत्यक्ष स्वरूपात भागधारणा करणाऱ्या सभासदांना त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्याकडे त्यांच्या ई-मेल आयडीची नोंदणी/ अपडेट करण्याची विनंती करण्यात येत आहे. पर्यायाने, सभासदांना त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी टीएसआर कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात असलेले ज्याचे डिसेंबर २२, २०२३ पासून लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड विलिनीकरण झाले आहे) कंपनीचे आरटीए यांच्याकडे एकात्मिक वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना प्राप्त करण्यासाठी https://liiplweb.linkintime.co.in/EmailReg/Email_register.html या लिंकला भेट देऊन सोमवार, जून १०, २०२४ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत किंवा त्यापूर्वी नोंदणी करू शकता.

**लाभांश आणि नोंद दिनांक :**

संचालक मंडळाने त्यांच्या मे १०, २०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मार्च ३१, २०२४ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी जर एजीएममध्ये संमत झाल्यास रु. २/- प्रत्येकी दर्शनी मूल्याच्या पूर्ण भरणा केलेल्या साधारण समभागांवर रु. ६.०० च्या अंतिम लाभांशाची घोषणा केली आहे (म्हणजेच ३००%) (सामान्य लाभांश म्हणून रु. ३.०० आणि विशेष लाभांश म्हणून रु. ३.०० चा सामवेश असलेले) आणि रु. २/- प्रत्येकी दर्शनी मूल्याच्या पूर्ण भरणा केलेल्या 'ए' साधारण समभागांवर रु. ६.२० च्या अंतिम लाभांशाची घोषणा केली आहे (म्हणजेच ३१०%) (सामान्य लाभांश म्हणून रु. ३.१० आणि विशेष लाभांश म्हणून रु. ३.१० चा सामवेश असलेले) ची घोषणा केली आहे, ज्याचे प्रदान शुक्रवार, जून २८, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी खालीलप्रमाणे स्रोतांच्या ठिकाणी कर कपात करून करण्यात येईल.

ए. मंगळवार, जून ११, २०२४ रोजी संपलेल्या दिवसाच्या अनुसार असलेले सर्व लाभार्थी, इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये केलेल्या भागांच्या संदर्भात डिपॉझिटरीजद्वारे देण्यात आलेल्या लाभार्थी मालकांच्या यादीनुसार; आणि

बी. प्रत्यक्ष स्वरूपात केलेल्या भागधारणेच्या संदर्भात सर्व सभासदांना मंगळवार, ११ जून, २०२४ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत कंपनीकडे दाखल करण्यात आलेल्या वैध ट्रान्समिशन किंवा ट्रान्स्पोझिशन विनंतीनुसार कार्यवाही केल्यानंतर.

कंपनीने मार्च ३१, २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी उपरोक्त नमूद अंतिम लाभांश सभासदांना प्राप्त होण्याकरिता पात्रता निश्चित करण्यासाठी मंगळवार, जून ११, २०२४ हा नोंद दिनांक निश्चित केला आहे.

**लाभांशावरील कर :**

वित्तीय कायदा, २०२० च्या अनुषंगाने, लाभांश उत्पन्न सभासदांच्या बाजूने करपात्र असेल आणि कंपनीला आयकर कायदा १९६१ (आयटी कायदा) मध्ये विहित केलेल्या दराने सभासदांना दिलेल्या लाभांशावर 'टीडीएस' कापून घेणे आवश्यक आहे. टीडीएस आवश्यकतांचे पालन करण्यास सक्षम करण्यासाठी, समभाग असल्यास सभासदांना कंपनी/टीएसआर यांच्याकडे त्यांनी त्यांची निवासी स्थिती, कायम खाते क्रमांक (पॅन) आणि श्रेणी त्यांच्या डीपीसोबत पूर्ण/अपडेट किंवा आवश्यक कागदपत्रे रविवार जून ९, २०२४ (सायं. ७.०० वा. पर्यंत) रोजी किंवा त्यापूर्वी सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे, ज्यामुळे कंपनीला योग्य टीडीएस/लागू असलेला कर दर निश्चित करता येईल, कागदपत्रांची पडताळणी करता येईल आणि सवलत देता येऊ शकेल. कंपनीने ज्या सभासदांच्या ई-मेल आयडी कंपनी/डिपॉझिटरीज यांच्याकडे नोंदणीकृत आहेत, त्यांच्या ईमेलवर केलेला पत्रव्यवहार दिनांकित मे २२, २०२४ अनुसार, आवश्यक परिशिष्टांसह लाभांशावरील टीडीएसची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. हे संप्रेषण कंपनीच्या https://www.tatamotors.com/investors/annual-reports/ या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध आहे.

सभासदांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी सेबीचे परिपत्रक क्र. सेबी/एचओ/एमआयआरएसडी/ एमआयआरएसडी_आरटीएएमबी/पी/सीआयआर/२०२१/६५५ दिनांकित नोव्हेंबर ३, २०२१ (त्यामध्ये त्यानंतर परिपत्रक क्र. सेबी/एचओ/ एमआयआरएसडी/ एमआयआरएसडी_आरटीएएमबी/पी/सीआयआर/२०२१/६८७ दिनांकित डिसेंबर १४, २०२१, सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी_पीओडी-१/पी/सीआयआर/ २०२३/३७ दिनांकित मार्च १६, २०२३ आणि सेबी/एचओ/ एमआयआरएसडी/पीओडी-१/ पी/सीआयआर/२०२३/१८१ दिनांकित नोव्हेंबर १७, २०२३) अनुसार एप्रिल १, २०२४ पासून असे अनिवार्य करण्यात आले आहे की, रोखेधारकांना लाभांशाचे प्रदान (प्रत्यक्ष स्वरूपात रोखे धारण केले असल्यास) केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रदान करण्यात येईल. असे प्रदान केवळ पॅन, प्रतिनिधीचा पर्याय, मोबाइल क्रमांकासह संपर्क तपशील, बँक खाते तपशील आणि सहीचा नमुना असल्यास प्रदान करण्यात येईल.

त्याशिवाय, सेबीद्वारे त्यांच्या संकेतस्थळावर खालील लिंकवर पाहण्यासाठी एफएक्यू जारी करण्यात आले आहे : https://www.sebi.gov.in/sebi_data/faqfiles/jan-2024/1704433843359.pdf

**सभासद ज्यांनी लाभांश प्राप्त होण्यासाठी त्यांच्या बँक खात्याचा तपशील अपडेट केला नाही, त्यांना खालील सूचनांचे पालन करण्याची विनंती करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| डिमटेरियलाइज्ड होल्डिंग | तुमच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स ('डीपी')द्वारे सुचविण्यात आलेल्या प्रक्रियेच्या अनुसार डिमॅट खात्याचा तपशील नोंद/अपडेट करावा. |
| फिजिकल होल्डिंग | कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्स्फर एजंट, टीएसआर कन्सल्टंट्स प्रायव्हेट लिमिटेड ('टीएसआर') यांच्याकडे विहित अर्ज **(आयएसआर-I)** आणि अन्य संबंधित अर्जामध्ये नोंद/अपडेट करावे. |

*टिप : सभासदांना तपशीलवार प्रक्रियेसाठी https://linkintime.co.in/home-KYC.html ला भेट देण्याची विनंती करण्यात येत आहे.*

इलेक्ट्रॉनिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की, संबंधित डीपींनी कंपनीला दिलेले त्यांचे बँक तपशील डीपीच्या लागू नियमांनुसार लाभांश पाठविण्याकरिता विचारात घेतले जातील आणि कंपनी कोणत्याही थेट विनंतीस स्वीकार करू शकणार नाही. अशा सभासदांकडून अशा बँक तपशिलांमध्ये बदल/जोडणे/हटवणे. त्यानुसार, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी सोमवार, १० जून, २०२४ पर्यंत त्यांच्या संबंधित डीपी यांच्याकडे इलेक्ट्रॉनिक बँक आदेश अपडेट केला आहे.

**टाटा मोटर्स लिमिटेडकरिता**
**सही/-**
**मलोय कुमार गुप्ता**
**कंपनी सचिव**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक: मे २८, २०२४**